मराठी साप्ताहिक

ठाणे आवृत्ती

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

वर्ष-०८ | अंक-४९ | मुंबई, मंगळवार २५ ते ३१ ऑक्टोबर - २०२२ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## सिडकोची नागरिकांना दिवाळी भेट
# 7,849 घरांची लॉटरी जाहीर



स्वतःचं हक्काचं घर असावं असं प्रत्येकालाच वाटत असतं आणि परत्येकजण त्यासाठी कष्ट करत असतो. घराचं तुमचं स्वप्न पूर्ण कारण्यासाठी सिडकोने ऐन दिवाळीत तुम्हाला एक आनंदाची बातमी दिली आहे. दिवाळीच्या दिवशी जर का तुम्ही सुध्दा घर खरेदी करण्याचा विचार करत असाल तर तर सिडकोने 7 हजार 749 घरांसाठी लॉटरी जाहीर केली आहे आणि घर खरेदी करण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांसाठी दिवाळीची भेट दिली आहे. त्यामुळे नवी मुंबईत हक्काचं घर तुम्ही खरेदी करू शकता. स्वस्तात घरे मिळणार सिडको कडून हरणासाठी लॉटरी जाहीर करण्यात आली आहे. ही जाहीर केलेली घरे नवी मुंबई मधील खारकोपर आणि बामणडोंगरी इथे आहते. ट्रान्सहार्बर रोड जवळ हा प्रकल्प तयार होणार आहे. दरम्यान या घरांच्या लॉटरीसाठी इच्छुकांना उद्यापासून नोंदणी करता येणार आहे. दरम्यान सिडकोने ऑगस्ट 2022 मध्ये काढलेल्या 4 हजार 158 घरांच्या नोंदणीसाठी 3 नोव्हेंबर 2022 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

नवी मुंबई मधील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा, खारघरमध्ये ही घरे आहेत. नागरिकांना परवडतील या दारात ही 4158 घरांपैकी 404 घरे ही पंतप्रधान आवास योजनेतंर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांसाठी आणि 3 हजार 754 घरे सर्वसाधारण वर्गातील नागरिकांसाठी उपलब्ध असणार आहेत. त्यात 145 व्यापारी गाळ्यांचीही लॉटरी काढण्यात आली होती.

# शिंदे गटातील 22 आमदार भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता, राजकीय चर्चांना उधाण



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेनेत उभी फूट पडली आहे. अनेक मंत्री, नगरसेवक आणि आमदारांनी शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना धक्का बसला आहे. परंतु शिंदे गटातील 22 आमदार भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

40 बंडखोर आमदारांपैकी 22 आमदार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटानं केला आहे. शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या सामना या वृत्तपत्रातील प्रसिद्ध सदर असलेल्या रोखठोकमधून हा दावा करण्यात आला आहे.महाराष्ट्राच्या ग्रामपंचायत, सरपंच निवडणुकीत यश मिळाल्याचा शिंदे गटाचा दावा खोटा आहे. शिंदे गटाचे किमान 22 आमदार नाराज आहेत. यातील बहुसंख्य आमदार स्वतःला भाजपात विलीन करून घेतील असे स्पष्ट दिसते. तसेच एकनाथ शिंदे यांनी स्वतःबरोबर महाराष्ट्राचे मोठे नुकसान केले. त्यामुळे महाराष्ट्र त्यांना माफ करणार नाही. शिंदे यांना तोफेच्या तोंडी देऊन भाजप स्वतःचे राजकारण करत राहील, असं सामनातील रोखठोकमध्ये म्हटलं आहे. देशाच्या राजधानीत शिंदेंचा प्रभाव नाही. देवेंद्र फडणवीस मंगळवारी दिल्लीत गेले आणि मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या महत्त्वाकांक्षी धोरणांतर्गत धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी रेल्वेकडून महाराष्ट्र सरकारला हव्या असलेल्या जागेसाठी रेल्वे मंत्रालयाकडून मंजुरी घेऊन आले, असं रोखठोक सदरातून म्हटलं आहे.

## राष्ट्रवादीचे कोल्हे शिंदे गटाच्या वाटेवर, दिवाळीनंतर करणार पक्षप्रवेश



मुंबई - एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत फुट पाडल्यानंतर त्यांच्या गटात विविध पक्षातील नेते आणि पदाधिकारी सामील झाले आहेत. येत्या महापालिका आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेकजण शिंदे गटात येत आहेत. आता राष्ट्रवादीतील शरद पवारांचा कट्टर समर्थक शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चा आहेत.सोलापूरमधील माजी महापौर दिलीप कोल्हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील होणार आहेत. प्रा. तानाजी सावंत यांची कोल्हे यांनी भेट घेतली. तसंच, दिवाळीनंतर कोल्हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचं सावंत यांनी सांगितलं. सोलापूरचे माजी उपमहापौर दिलीप कोल्हे हे शरद पवारांचे कट्टर समर्थक मानले जातात. त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीचा सोडण्याचा निर्णय घेतल्याने अनेकांच्या भूवया उंचावल्या आहेत. राष्ट्रवादीचे सोलापूर शहर निरीक्षक शेखर माने यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला असल्याचीही चर्चा आहे. मात्र, मी का जातोय, याचे तुम्ही आणि शहराध्यक्ष जाधव यांनी आत्मचिंतन करा, मग माझ्याशी बोला, असं आवाहन कोल्हे यांनी केलंय.

# वृद्ध महिलांना पैशांचे बनावट बंडल दाखून दागिने लंपास करुन फसणूक करणारा सराईत गुन्हेगारास अटक - माणिकपूर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षाची कामगिरी



माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०९/०९/२०२२ रोजी तक्रारदार श्रीमती ज्योती दत्ताराम सकपाळ, वय ६५ वर्ष या वसई स्टेशन परिसरात भाजी खरेदी करण्यासाठी गेल्या असता दोन अनोळखी इसमांनी त्यांना बोलण्यात गुंतवून कोणाचा काहीही भरोसा नाही असे बोलुन त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडील सोन्याच्या कुड्या, चैन व कानातील साखळया असे एकूण रु. ५५,०००/ किंमतीचे दागिने काढुन देण्यास भाग पाडुन हातचलाखी करुन फिर्यादी यांना मुळ दागिन्यांच्या बदल्यात रुमालातुन मातीचे खडे देवुन त्यांची फसवणूक केल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याने माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. ३१९/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपी हे पालघर, ठाणे, नवी मुंबई, मुंबई परिसरात अशा प्रकारचे गुन्हे वारंवार करीत असल्यामुळे वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन माणिकपुर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास आरोपींचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक माहितीच्या अनुषंगाने आरोपींना निष्पन्न करुन दि.१९/१०/२०२२ रोजी अर्जुन सलाट ऊर्फ मारवाडी यास नेवालीगाव, हाजीमलंग, कल्याण येथुन सापळा रचुन अटक केली आहे.

आरोपी व त्याचे सहका-यांनी पालघर, ठाणे, नवी मुंबई, मुंबई परिसरात अशाच प्रकारचे गुन्हे करुन वृध्द महिलांची फसवणुक केल्याची माहिती दिली असुन त्याचेकडुन अंदाजे ७९.५ ग्रम वजनाचे अंदाजे किंमत रुपये. २,७८,१२३/ रकमेचे दागिने जप्त करण्यात आले आहे.

**अटक आरोपी याचेकडुन खालील गुन्हे उघड करण्यात आलेले आहेत.**

१. तुळीज पोलीस ठाणे गु.र.क्र. ५५७/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.
२. माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. ३१९/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.
३. वसई रेल्वे पोलीस ठाणे गु.र.क्र. ७६५/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.
४. कल्याण रेल्वे पोलीस ठाणे गु.र.क्र. १४२१/२०२२ कलम ४२०,३४ भा.दं.वि.
५. वाशी रेल्वे पोलीस ठाणे गु.र.क्र. २७१/२०२२ कलम ३२८,३७९,३४ भा.दं.वि.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, शामेश चंदनशिवे, अनिल चव्हाण, धनंजय चौधरी, पो.शि. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.


# इन्स्टाग्रामवर प्रेम, विवाहित तरुणाने पुण्यातील मुलीला जाळ्यात ओढलं, गुजरातमध्ये आक्रित



पुणे : युग डिजिटल झालं आणि अंतर कमी झालं. मात्र, याचे अनेक तोटे देखील वेळोवेळी समोर येत आहेत. सोशल माध्यमांचा गैरवापर अनेकदा होताना समोर येत आहे. अशीच एक धक्कादायक घटना पुण्यातून समोर आली आहे. इंस्टाग्राम वरून झालेल्या ओळखीची पुण्याच्या एका तरुणीला मोठी किंमत मोजावी लागली आहे. इंस्टाग्रामवरून ओळख झाल्यानंतर तरुणाने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवत गुजरातला नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. अखेर तरुणीने तिथून स्वतःची सुटका करून घेत पुण्याला येऊन झाकीर इस्माईल झवेरीवाला ( वय 35, रा. गुजरात ) नामक तरुणावर येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. 23 वर्षीय फिर्यादी तरुणी मूळची नेपाळची असून ती सध्या पुण्यात ढोले पाटील रोडवर वास्तव्यास आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, झाकीर आणि पीडिता यांची इंस्टाग्रामवर नोव्हेंबर 2021 मध्ये ओळख झाली. ओळख झाल्यानंतर दोघांमध्ये बोलणं वाढू लागलं. ओळखीचं रूपांतर प्रेमात झालं आणि त्यानंतर त्यांची प्रत्यक्षात भेट झाली. भेटीनंतर झाकीरने पीडितेला लग्नाचं आमिष दाखवत गुजरात मधील बडोद्याला नेले. तेथे त्यांनी पीडितेवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केले. पीडित तरुणीने झाकीरला लग्नाबद्दल विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरं देत असे.

याचवेळी पीडित तरुणीला झाकीरच अगोदरच लग्न झालेलं कळालं. त्यानंतर झाकीरने पीडित तरुणीला गुजरात मधील एका घरात डांबून ठेवत तिला ॲसिड टाकून जीवे मारण्याची धमकी दिली. मात्र एक दिवस झाकीर आपल्या पहिल्या पत्नीला भेटायला गेल्याने पीडितेने तिथून मोठ्या शिताफीने आपली सुटका केली आणि थेट पुणे गाठलं. मात्र झाकीरने वेगवेगळया फोन नंबर वरून तिला फोन करून 'तू कुठेही गेलीस तरी तुला सोडणार नाही' अशी धमकी दिली. झाकीरच्या सारख्या धमक्याला घाबरून अखेर पीडितेने येरवडा पोलीस ठाण्यात झाकीरविरोधात फिर्याद दाखल केली. पीडीतीचा फिर्यादीनुसार झाकीरवर वेगवेगळ्या कलमांच्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. येरवडा पोलीस पुढील तपास करत असून आरोपीस अद्याप अटक झालेली नाही.





# शलगम (टर्निप) उत्पादन तंत्रज्ञान

शलगमच्या युरोपीय जातींची लागवड सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत केली जाते; तर आशियाई जातींची लागवड जुलै ते सप्टेंबर या कालावधीत केली जाते. महाराष्ट्रात शलगमच्या चांगल्या प्रतीची मुळे मिळण्यासाठी हिवाळ्यात लागवड करावी लागते.

शलगमची लागवड ३० बाय १५ सेंटीमीटर अंतरावर करावी. लागवडीसाठी हेक्टरी ३ ते ४ किलो बियाणे वापरावे. शलगमची लागवड सपाट वाफ्यात करता येते. लागवडीपूर्वी जमिनीची व्यवस्थित मशागत करून वाफे तयार करावेत. जमीन प्रथम ओलावून घ्यावी. रोपांच्या दोन ओळींत ३० सेंटीमीटर अंतर आणि दोन रोपांत १५ सेंटीमीटर अंतर ठेवून बियांची पेरणी करावी. सरी-वरंबा पद्धतीने लागवड करण्यासाठी ३० ते ४५ सेंटीमीटर अंतरावर सऱ्या पाडून घ्याव्यात. सरीवर १५ सेंटीमीटर अंतरावर बिया टोकून द्याव्यात. बिया १.२५ सेंटीमीटर खोल पेराव्यात. शलगमचे बी लहान असल्यामुळे समप्रमाणात पेरणी होण्यासाठी बियांमध्ये बारीक वाळू किंवा कोरडी माती मिसळून बी पेरावे. शलगमची लागवड बी फेकून करता येते; परंतु ओळीने बी पेरल्यास आंतरमशागत चांगली करता येते.

**खत व्यवस्थापन-** या पिकाला १५ ते २० टन शेणखत जमीन तयार करताना जमिनीत मिसळून द्यावे. शलगमच्या पिकाला ६० किलो नत्र, ४० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश दर हेक्टरी द्यावे. नत्राची अर्धी मात्रा आणि स्फुरद आणि पालाशाची पूर्ण मात्रा लागवड करताना द्यावी. तर नत्राची उरलेली अर्धी मात्रा लागवडीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावी.

**पाणी व्यवस्थापन-** पिकाला बियांच्या पेरणीनंतर हलके पाणी द्यावे. बियाण्यांची उगवण झाल्यावर जमिनीचा प्रकार, हवामान आणि पिकांच्या वाढीनुसार १०-१२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

**आंतरमशागत-**शलगम बियांची उगवण झाल्यावर पिकाची विरळणी करून एका ठिकाणी १० ते १५ सेंटीमीटर अंतरावर एकच रोप ठेवावे. त्यानंतर एक ते दोन वेळा निंदणी करून शेत तणरहित ठेवावे. बियाण्यांच्या पेरणीनंतर २५-३० दिवसांनी कंदाची वाढ चांगली होण्यासाठी हलकी खांदणी करून कंदांना मातीची भर द्यावी. याच वेळेला नत्राची राहिलेली अर्धी मात्रा द्यावी.

**कीड नियंत्रण-** या पिकावर प्रामुख्याने काळी अळी आणि मावा या किडींचा प्रादुर्भाव होतो. ह्या किडींच्या नियंत्रणासाठी उगवण झाल्यावर पिकावर १० लीटर पाण्यात २० मिलिलीटर मॅलॅथिऑन हे कीटकनाशक मिसळून दोन वेळा फवारणी करावी.

**रोग नियंत्रण-** या पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. करपा ह्या रोगामुळे पानांवर डाग पडतात. काही वेळा कंदावर हा रोग पसरतो. ह्या रोगाच्या नियंत्रणासाठी १० लीटर पाण्यात २५ ग्रॅम डायथेन एम-४५ मिसळून पिकावर फवारणी करावी.

**काढणी -** काढणी योग्य वेळी करावी. उशिरा काढणी केल्यास कंदाची प्रत खराब होते. साधारणपणे कंदाचा आकार ५ ते ७.५ सेंटीमीटर झाल्यावर शलगमची काढणी करावी. शलगमची काढणी उशिरा केल्यास कंद तंतुमय होतात आणि चव कडू लागते. शलगमच्या मुळाची काढणी सोपी जावी म्हणून पिकाला काढणीपूर्वी हलके पाणी द्यावे आणि नंतर काढणी करावी. काढणी केल्यावर कंदाचा वरील पातीचा भाग कापून टाकावा. कंद पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावेत.

**उत्पादन -** शलगम (टर्निप) पिकाचे सरासरी हेक्टरी उत्पादन २० ते २५ टन मिळते. शलगमचे रोगट कंद बाजूला काढावेत आणि आकारमानानुसार प्रतवारी करावी. नंतर कंद लाकडी खोक्यात किंवा टोपलीत व्यवस्थित भरून विक्रीसाठी पाठवावेत. टोपलीत भरताना टोपलीच्या तळाशी आणि बाजूला पाने अंथरावीत व त्यावर कंद रचावेत.

# राजगिऱ्याची मिश्रपीकलागवड

**राजगिरा एक जलद गतीने वाढणारे पीक असून द्विदल वर्गीय पिकांमध्ये यांचा समावेश होतो. जर आपण महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रमध्ये थोड्याबहुत ठिकाणी लागवड केली जाते. अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यात तसेच बीड मधील काही ठिकाणी याची चांगल्या पद्धतीने लागवड होते. राजगिऱ्याचा रंग हा सोनेरी, पिवळा किंवा काळा म्हणजेच वेगवेगळ्या जातीनुसार वेगवेगळा असतो. या लेखामध्ये आपण रब्बी हंगामात सलग पीक म्हणून लागवड केल्यास अधिक उत्पादन देणाऱ्या राजगिरा पिकाविषयी माहिती घेऊ..**



**फुले कार्तिकी-** ही जात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी विकसित केली असून लागवड केल्यानंतर एकशे दहा दिवसांमध्ये काढणीस तयार होते. ही जात पाच ते सात फुटांपर्यंत वाढते व पाने हिरव्या रंगाचे असतात. या जातीच्या राजगिऱ्याचे कणीस लांबट व पिवळ्या रंगाचे असून त्याची लांबी ४० ते ६० सेमीमीटरपर्यंत असते. पीक पक्व झाल्यावर लवकर कापणी करावी लागते नाही तर दाणे पडतात व उत्पादनात घट होते. सुधारित तंत्राचा अवलंब केला तर एका एकरमध्ये पाच ते सहा क्विंटल उत्पादन मिळणे शक्य आहे.

**जमीन व हवामान-** मध्यम व भारी काळी कसदार, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन याच्यासाठी महत्त्वाचे असून जमिनीचा सामू साडेसहा ते साडेसातपर्यंत असणे गरजेचे आहे. पाणथळ तसेच चोपण जमिनीत व हलक्या जमिनीमध्ये लागवड करू नये. लागवड करण्याअगोदर नांगरट करून जमीन भुसभुशीत करून घेणे गरजेचे असून त्यानंतर एका एकरासाठी दोन ते तीन टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. राजगिरा पिकांच्या उत्तम वाढीसाठी थंड व कोरडे हवामान चांगले राहते. सरासरी १० ते ३० अंश सेल्सिअस तापमान असल्यास या पिकाची वाढ चांगली होते.

**पेरणी कालावधी-** ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या तर नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात राजगिरा लागवड करावी. पेरणीस उशीर करू नये कारण उशीर झाल्यास सुरुवातीच्या काळातील कमी तापमानामुळे पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. तुम्हाला एका एकरमध्ये राजगिरा लागवड करायची असेल तर ६०० ते ९०० ग्रॅम बियाणे लागते. राजगिऱ्याची पेरणी करताना बियाण्यामध्ये बारीक वाळू किंवा रवा मिसळून घ्यावा कारण बियाणे खूप बारीक असते. राजगिऱ्याच्या दोन झाडांमध्ये १५ सेंटीमीटर व दोन ओळींतील अंतर ४५ सेंटीमीटर ठेवावे. पेरणी करताना एक ते दोन सेंटीमीटरपेक्षा जास्त खोलवर पेरणी करू नये.

**पाणी व्यवस्थापन-** पेरणी केल्यानंतर सारे पाडून थोडेसे हलके पाणी द्यावे. पेरणीनंतर २५ दिवसांनंतर, जेव्हा पीक फुलोरा अवस्थेत असते तेव्हा व दाणे भरण्याच्या काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये. पिकाची गरज ओळखून त्यानुसार नियोजन करावे.

आंतरमशागत - पेरणी झाल्यानंतर २० ते २५ दिवसांनी लहान रोपांची विरळणी करून घ्यावी. एक-दोन वेळा खुरपणी तसेच कोळपणी करून जमीन मोकळी व भुसभुशीत ठेवणे गरजेचे आहे.

काढणी व उत्पादन- पेरणी केल्यानंतर साधारण ११० दिवसांनंतर हे पीक काढणीस येते. या तंत्राचा वापर केल्यास एकरी चार ते दहा क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते.

# जमिनीच्या खोलीनुसार पेरा रब्बी ज्वारीचे वाण



**फुले वसुधा -** भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस. पक्व होण्याचा कालावधी ११६ ते १२० दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरेशुभ्र चमकदार. भाकरीची चव उत्तम. ताटे भरीव, रसदार व गोड. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. कोरडवाहू धान्य उत्पादन प्रती हेक्टरी २४-२८ क्विं. व कडबा ६५-७० क्विं. बागायती उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी ३०-३५ क्विं. व कडबा ७०-७५ क्विं.

**फुले यशोदा -** भारी जमिनीत लागवडीसाठी प्रसारित. पक्वता कालावधी १२० ते १२५ दिवस. दाणे पांढरेशुभ्र चमकदार, भाकरीची चव चांगली. कोरडवाहू धान्य उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी २५-२८ क्विं. व कडबा ६०-६५. क्विं. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी ३०-३५ क्विं. व कडबा ७०-८० क्विं.

**सी एस व्ही.२२ -** भारी कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस. पक्वता कालावधी ११६ ते १२० दिवस. दाणे चमकदार, भाकरीची चव चांगली. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. कोरडवाहू उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी २४-२८ क्विं. व कडबा ६५-७० क्विं. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी ३०-३५ क्विं. व कडबा ७०-८० क्विं.

**परभणी मोती -** भारी कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस. पक्वता कालावधी १२५ ते १३० दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरेशुभ्र चमकदार. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. कोरडवाहू उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी १७ क्विं. व कडबा ५०-६० क्विं. बागायती धान्य उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी ३२ क्विं. व कडबा ६०-७० क्विं.

**फुले रेवती-** भारी जमिनीत बागायतीसाठी शिफारस. पक्वता कालावधी ११८ ते १२० दिवस. दाणे मोत्यासारखे, पांढरे चमकदार. भाकरीची चव उत्कृष्ट. कडबा पौष्टिक व अधिक पाचक. धान्य उत्पादन सरासरी प्रती हेक्टरी ४०-४५ क्विं. व कडबा ९०-१०० क्विं.

**मालदांडी ३५-१-** मध्यम खोल जमिनीत कोरडवाहूसाठी शिफारस. पक्वता कालावधी ११८ ते १२० दिवस. दाणे पांढरे. भाकरीची चव चांगली. खोडमाशी प्रतिकारक्षम. धान्य उत्पादन प्रती हेक्टरी १५-१८ क्विं. व कडबा ६० क्विं.

**फुले मधुर -** हुरड्याकरिता रब्बी हंगामासाठी प्रसारित. या वाणापासून ३०-३५ क्विं./हे हुरड्याचे उत्पादन मिळते. हुरडा अवस्था येण्यास ९३ ते ९८ दिवस लागतात. हुरडा अवस्थेत दाणे सहज सुटण्याचे प्रमाण हे ९५ टक्के पेक्षा जास्त आहे.

**फुले उत्तरा-** हुरड्यासाठी शिफारस. हुरड्याची अवस्था येण्यास ९०-१०० दिवस. भोंडातून दाणे सहज बाहेर पडतात. सरासरी ७०-९० ग्रॅम इतका हुरडा मिळतो. हुरडा चवीस सरस अत्यंत गोड, शिवाय ताटेही गोड असल्याने जनावरे कडबा चवीने खातात.

**फुले पंचमी -** लाह्याचे प्रमाण (वजनानुसार) ८७.४ टक्के. लाह्या मोठ्या प्रमाणात फुटून रंगाने पांढऱ्या शुभ्र होतात. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. महाराष्ट्रातील कोरडवाहू क्षेत्रासाठी लाह्यांसाठी प्रसारित.

रब्बी ज्वारीपासून अधिक धान्य, कडबा आणि निव्वळ नफा मिळवण्यासाठी पेरणीपूर्वी १० ते १२ तास ज्वारीचे बियाणे ०.०५ % पोटॅशियम नायट्रेटच्या द्रावणात भिजवून शिफारशीत खत मात्रेसह पेरणी करावी आणि पेरणी नंतर ५५ दिवसांनी २% पोटॅशियमची फवारणी करावी. शक्यतो हस्ताचा पाऊस पडून गेल्यावर पेरणी करणे हिताचे आहे. पेरणीपूर्वी बियाण्यास गंधकाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १ किलो बियाण्यास ३०० मेष गंधकाची ४ ग्रॅम याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. त्यामुळे काणी हा रोग येत नाही. गंधकाची प्रक्रिया केल्यानंतर १० किलो बियाण्यास प्रत्येकी २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व पीएसबी या जीवाणू संवर्धनाची प्रक्रिया करावी.

पेरणीसाठी प्रती हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. ज्वारीची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने ४५ बाय १५ से.मी अंतरावर एकाच वेळी खते व बियाणे स्वतंत्र दोन चाड्यातून पेरावे. बागायत ज्वारीच्या अपेक्षित उत्पादनासाठी ज्वारीची पेरणी ४५ बाय १२ से. मी. अंतरावर करावी. पेरणीच्या वेळी संपूर्ण नत्र, स्फुरद व पालाश द्यावे.



# जनावरांच्या आरोग्यात लोहाचा समावेश करा

**शेतकरी शेतीसोबत अनेक जोडव्यवसाय करीत असतात. दुग्धव्यवसाय हा यामधील प्रमुख व्यवसाय. मात्र या व्यवसायामध्ये शेतकऱ्यांना भरपूर काळजी घ्यावी लागते. जनावरांच्या आहाराची योग्य काळजी घेतली तर शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येते. त्यामुळे पशुपालकांनी ही काळजी घ्यावी.**



**● जनावरांच्या आरोग्यात लोहाचे महत्त्व-**

जनावरांच्या आहारात लोहाचा वापर असणे गरजेचे असते. महत्त्वाचे म्हणजे जनावरांच्या शरीरातील लोहाची पातळी केवळ शोषणाद्वारे नियंत्रित केली जाते. जनावरांच्या शरीरातील लोह उत्सर्जनाची यंत्रणा ही एक अनियंत्रित प्रक्रिया आहे जी घाम येणे, केस आणि त्वचेच्या पेशी गळणे आणि एन्टरोसाइट्सचे जलद उलाढाल आणि उत्सर्जन याद्वारे होते. लोह रक्तातील साखरेचे ऊर्जेमध्ये रूपांतर करण्यास मदत करते. लोह रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. लोह निरोगी त्वचा, केस आणि नखांसाठी महत्त्वाचे आहे. लोह हे रक्तनिर्मितीसाठी आवश्यक घटक आहे. जनावरांच्या शरीरातील सुमारे ७० टक्के लोह रक्तातील हिमोग्लोबीन नावाच्या लाल रक्तपेशींमध्ये आणि मायोग्लोबीन नावाच्या स्नायूंच्या पेशींमध्ये आढळते. रक्तातील ऑक्सिजन फुप्फुसातून उतींमध्ये हस्तांतरित करण्यासाठी हिमोग्लोबीन आवश्यक आहे.

**कमतरतेमुळे होणारी लक्षणे-**

१) रवंथ करणाऱ्या जनावरांच्यामध्ये अत्यंत थकवा येतो. अशक्तपणा येतो. त्वचा फिकट होते. छातीत दुखणे, जलद हृदयाचा ठोका होणे किंवा श्वास लागणे इत्यादी लक्षणे उद्भवतात.

२) पाय थंड होणे, जिभेची जळजळ किंवा वेदना होणे. नखे ठिसूळ होणे इत्यादी लक्षणे उद्भवतात. ही लक्षणे दिसताच तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

# विराट विजयाचे फुटले फटाके



## हार्दिक पंड्याची अष्टपैलू खेळी

विराट कोहलीचा झंझावात आणि त्याला मिळालेली हार्दिक पंड्याची साथ या बळावर शेवटच्या चेंडूपर्यंत दोलायमान स्थितीत रंगलेल्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध रोमहर्षक विजय मिळवला. या विजयामुळे टी-२० विश्वचषक स्पर्धेची सुरुवात भारताने दणक्यात केली आहे. लक्ष्मीपूजनाच्या पूर्वसंध्येला सलामीचा सामना जिंकताच देशभरात भारताच्या विजयाचा जल्लोष फटाके फोडून करण्यात आला.

स्वींगचे संकट आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत-पाकिस्तान यांच्यातील सलामीच्या लढतीचा दबाव यामुळे या सामन्याला वेगळाच रंग चढला होता. वेगवान गोलंदाजांना अनुकूल अशा खेळपट्ट्यांवर तगड्या गोलंदाजांचा भरणा असलेल्या प्रतिस्पर्धी पाकविरोधात १६० धावांचा पाठलाग करणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखेच होते. अपेक्षेप्रमाणे सुरुवातीलाच भारताची घसरगुंडी झाली. अवघ्या ३१ धावांवर लोकेश राहुल, कर्णधार रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव या बिनीच्या शिलेदारांसह अक्षर पटेल हे चार फलंदाज तंबूत परतले होते. सहा षटकांत भारताच्या अवघ्या ३० धावा झाल्या होत्या. विराट कोहली आणि हार्दिक पंड्या या जोडीवर धावांचा वेग वाढविण्यासह सामना जिंकवण्याची अवघड अशी जबाबदारी पडली. सुरुवात खराब झाल्याने भारत बॅकफुटवर गेला होता. अशा परिस्थितीत विराट कोहली भारतासाठी संकटमोचन ठरला. सुरुवातीला विराटने विकेट वाचविण्यावर भर दिला. त्याला पंड्यानेही चांगली साथ दिली. सेट झाल्यावर मग धावांची गती वाढविण्याला प्राधान्य दिले. विराट कोहलीने ६ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ५३ चेंडूंत नाबाद ८२ धावा तडकावल्या. त्याला पंड्याच्या ४० धावांची साथ मिळाली. क्षणाक्षणाला सामना वळण घेत होता. शेवटच्या चेंडूवर भारताला विजयासाठी १ धावाची आवश्यकता होती. रवीचंद्रन अश्वीनने चौकार लगावत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. सामन्याच्या सुरुवातीला भारतीय फलंदाजांना शांत ठेवणाऱ्या शाहिन शाह आफ्रिदी, हरिस रौफ यांना डेथ ओव्हर्समध्ये विराटने चांगलेच तुडवले. त्यामुळे सुरुवातीला घातक वाटणारे हे गोलंदाज नंतर मात्र थंड पडले.

तत्पूर्वी नाणेफेकीचा कौल जिंकून भारताने पाकिस्तानला प्रथम फलंदाजीला पाचारण केले. भुवनेश्वर कुमार आणि अर्शदीप सिंग यांनी खेळपट्टी, वातावरण यांचा अचूक वापर करत आपल्या स्वींगने पाकिस्तानच्या फलंदाजांना वेडे केले. भुवनेश्वरने पहिल्या षटकात आऊट स्विंगने पाकिस्तानचा सलामीवीर मोहम्मद रिझवानला धडकी भरवली. तीच लय अर्शदीप सिंगनेही कायम ठेवत संघाच्या दुसऱ्या आणि वैयक्तिक अशा पहिल्या षटकातील पहिल्याच चेंडूवर इन स्विंगवर पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला पायचीत केले. संघाच्या चौथ्या षटकात उसळत्या चेंडूवर अर्शदिपने रिझवानला झेलबाद करत भारताला मोठे यश मिळवून दिले. दोन्ही तगडे सलामीवीर माघारी परतल्यानंतर पाकिस्तानचा संघ दबावाखाली आला. शान मसूदही सापळ्यात अडकलाच होता, पण विराटने धावबाद करण्याची संधी सोडली आणि पाकच्या जीवात जीव आला. शान मसूद आणि इफ्तिकार अहमद यांनी पाकिस्तानला सावरले. दोघांनीही आपले वैयक्तिक अर्धशतक झळकावत पाकिस्तानला २० षटकांत १५९ धावा जमवून दिल्या. भारताच्या अर्शदीप आणि हार्दिक पंड्या यांनी प्रभावी गोलंदाजी केली. दोघांनीही ३ फलंदाजांना माघारी धाडले. भुवनेश्वरने ४ षटकांत २२ धावा देत १ बळी मिळवला.



# श्रीलंकेकडून आयर्लंडचा धुव्वा



गोलंदाजांनी केलेली अप्रतिम कामगिरी आणि कुशल मेंडीसची धडाकेबाज फलंदाजी या बळावर श्रीलंकेने दुबळ्या आयर्लंडवर ९ विकेट राखून सहज विजय मिळवला. या विजयासह टी-२० विश्वचषक स्पर्धेची सुरुवात श्रीलंकेने विजयाने केली आहे.

महिश तिक्षना, वानींदू हसरंगा यांच्यासह सर्वच गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी करत आयर्लंडला २० षटकांत १२८ धावांवर रोखले. हॅरी टेक्टरने संघातर्फे सर्वाधिक ४५ धावा केल्या. त्याला पॉल स्टर्लींगने ३४ धावांची साथ दिली.

प्रत्युत्तरार्थ फलंदाजीला आलेल्या श्रीलंकेच्या विजयाचा हिरो सलामीवीर कुशल मेंडिस ठरला. २७ वर्षीय मेंडिसने ६८ धावांची इनिंग खेळली. त्याने डी सिल्वासोबत ६३ धावांची भागीदारी केली. धनंजया डी सिल्वाने ३१, तर चारिथ असलंकाने नाबाद ३१ धावांची खेळी खेळली. या जोरावर श्रीलंकेने १५ षटकांत एका फलंदाजाच्या बदल्यात विजयी लक्ष्य गाठले.

संघाच्या फिरकीपटूंनी अप्रतिम कामगिरी केली. त्याने ८ पैकी ५ विकेट घेतल्या. तर वेगवान गोलंदाजांच्या खात्यात ३ विकेट आल्या. श्रीलंकेचे गोलंदाज एकामागून एक विकेट घेत राहिले.

संपादकीय...



# क्रिकेट त्रयोदशी!

विराट कोहलीच्या जिगरबाज खेळीच्या जोरावर अखेरच्या षटकात भारताने मेलबर्नच्या क्रिकेट मैदानावर चमत्कार घडवून आणला. सुरवातीला ढेपाळलेल्या भारतीय फलंदाजीत कोहली-हार्दिक पंड्या यांनी जणू संजीवनी मंत्र फुंकून पाकिस्तानवर अक्षरशः अखेरच्या चेंडूवर विजय मिळवला आणि भारतात खऱ्या अर्थाने दिवाळी सुरु झाली. त्रेपन्न चेंडूवर नाबाद ८२ धावा कुटणाऱ्या विराट कोहलीने मेलबर्नला जे फटाके फोडले, ते आता आठवडाभराच्या दिवाळीपर्वात दुमदुमत राहणार आहेत. खेळात हारजीत होत असते, सर्वोत्तम संघ जिंकला पाहिजे, असे सुभाषित नेहमी सांगितले जाते. ते खरेही आहे. अपवाद फक्त भारत वि. पाकिस्तान या लढतीचा! या पारंपरिक लढतींमध्ये पराभव होणे हे ना भारतीय मानसिकतेला सहन होते, ना पाकिस्तानात तो पराभव पचवला जातो. गेल्या वेळी पाकिस्तानकडून हार पत्करलेला भारत यावेळी वचपा काढणार का, ही 'राष्ट्रीय' चिंता होती. पण ऐन दिवाळीच्या तोंडावर टी-ट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय संघाने आपल्या चाहत्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या. या विजयामुळे साहजिकच देशभर जल्लोष केला जात आहे. दिवाळीची खरेदी, दीपोत्सव, पारंपरिक रितीभाती बाजूला ठेवून तमाम क्रिकेटवेडे टीव्हीच्या पडद्याला चिकटले होते, त्यांच्या प्रार्थनेला फळ आले. वसुबारस किंवा धनत्रयोदशीपासून दिवाळीचे आनंदपर्व साजरे केले जाते. रविवारचा दिवस तसा 'भाकड'च मानला जात होता. पण भारतीय संघाने या भाकड दिवशीच दिवाळी साजरी केली.

गेल्या दोन-तीन दिवसात एकंदर तीन मनाजोगत्या लहानमोठ्या गोष्टी भारतीयांची दिवाळी सुफळ संपूर्ण करणाऱ्या घडल्या. सर्वप्रथम, दिवाळीच्या आनंदपर्वारंभीच पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या अमृतमहोत्सवानिमित्त ७५ हजार युवकांना सरकारी नोकऱ्यांची ऑफर लेटर्स समारंभपूर्वक दिली. बेरोजगारीची समस्या खरोखर खूपच मोठी आहे. त्यामानाने पाऊण लाखांना नोकऱ्या म्हणजे 'उंटाच्या तोंडी जिऱ्याचा दाणा' अशी टीका विरोधकांकडून होते आहे. तशी ती होणे, स्वाभाविकच म्हणायचे. तरीही अभावाच्या या काळात ही सुरवात काही वाईट म्हणता यायची नाही. बेरोजगारीच्या प्रश्नाला मायबाप सरकारने अखेर हात घातला, हे काय कमी महत्त्वाचे आहे? एवढ्या एका गोष्टीसाठी तरी तिचे स्वागत करायला काय हरकत आहे? येत्या वर्षभरात दहा लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासनही मिळाले आहे. तूर्त तरी किमान पाऊण लाख घरांमध्ये दिलाश्याची ज्योत पेटेल, हेही नसे थोडके. पंतप्रधानांच्या या 'रोजगार-दिवाळी'च्या पाठोपाठ आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील अवकाश केंद्रातून आणखी एक आनंदाची खबर येऊन धडकली. 'इस्रो'ने रविवारी मध्यरात्री 'बाहुबली' या महाकाय प्रक्षेपकाच्या साह्याने एकाच वेळी ३६ उपग्रह पृथ्वीच्या भू-स्थिर कक्षेत नेऊन सोडले. हा पराक्रम 'इस्त्रो'ने यापूर्वीही करुन दाखवला आहे. पण यावेळचे विशेष एवढे की हे तीन डझन उपग्रह एका ब्रिटन-स्थित संपर्कक्षेत्रातील कंपनीसाठी व्यापारी तत्त्वानुसार सोडण्यात आले. हा शुद्ध व्यवसाय होता. एतद्देशीय अवकाश संशोधनातून अर्थार्जनाचे एक नवे पर्व त्यामुळे सुरु झाले. ही खरी विज्ञान-दिवाळी! रोजगारदिवाळी आणि त्यांच्या पाठोपाठ भारतीय संघाने दणकेबाज विजयानिशी क्रिकेट त्रयोदशी साजरी केली. आता सोमवारी नरकचतुर्दशीला पहिल्या आंघोळीच्या वेळी टाचेखाली कारीट फोडले काय नि नाही फोडले काय, सारखेच!

फारा दिवसांनी यंदा खुल्या आभाळाखालची दीपावली अंगणात अवतरली आहे. तिला निर्बंधांचा काच नाही, प्राणांतिक संकटांची आंच नाही. स्वच्छ पिवळीरंजन उन्हे माळारानावर खिदळावीत, तशी दिवाळी दारात आली. अर्थात याचा अर्थ सगळे काही आलबेल झाले आहे, असे नव्हे. ज्यांच्या घरात दिवा सोडा, साधी चूलदेखील पेटली नाही, अशीही हजारो दुर्दैवी घरे आपल्या आसपासच आहेत. कित्येक घरांनी आपल्या चार भिंतीत नांदणारे आप्त गेल्या दीड-दोन वर्षांत गमावले. कुणी साथरोगात गेले, कुणी दुष्काळात गेले, कुणी महापुरातल्या वाताहतीत नामशेष झाले. या दुर्दैवी उंबरठ्यांच्या आतमध्ये दीपावलीची पावले यंदाही उमटणार नाहीत. दिवाळीचा उत्सव साजरा करताना त्याचेही भान आपण ठेवायला हवे. एक तरी माणुसकीची पणती त्यांच्यासाठीही आपल्या हदयात तेवती राहावी. ज्यांना सुगीचा थोडका जरी स्पर्श झाला आहे,

● ● ●

# दिवाळी ती दिवाळीच !

जगण्यावरचा विश्वासच उडून जात असताना.. नातेवाईक, शेजारी यांचा अकस्मात मृत्यू पाहताना.. मनाची उभारी कशीबशी टिकवून ठेवताना गेल्या दोन वर्षांत करोनाखाली दबून गेलेल्या आनंदाच्या सगळ्या प्रेरणा

या वर्षीच्या दिवाळीत पुन्हा एकदा उमलून येऊ लागलेल्या दिसत आहेत.. या आनंदाला महागाईची, जागतिक मंदीच्या सावटाची, कशाकशाचीही तमा यंदा तरी नाही! भूतकाळातील सारे क्लेश आणि वेदना दूर सारत पुन्हा नव्या उत्साहाने आणि आनंदाने यंदाच्या दिवाळीला आपण सामोरे जात आहोत. दिवाळीपूर्वीच्या खरेदीचा उत्साह हेच तर दाखवतो आहे. कोणतेही धार्मिक कर्मकांड नसलेला असा हा देशभरातील सण. गेल्या दोन वर्षांत ना खरेदी करावीशी वाटली, ना फराळ करावासा वाटला. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे आणि नातेवाईकांकडे जावे लागले, ते सांत्वनासाठी किंवा दुःख वाटून घेण्यासाठी. करोनाच्या लाटेत बुडालेल्या, क्षतिग्रस्त झालेल्या अशा अनेकांसाठी यंदाची दिवाळी पुन्हा एकदा आनंदाकडे झेपावणारी ठरते आहे. देशातील सगळेच सण रस्त्यावर येऊन, गर्दी करत साजरे करण्याची नवी मानसिकता गेल्या काही दशकांत निर्माण होऊ लागली आहे. दिवाळीचा आनंद असा रस्त्यावर येऊन साजरा करायची गरजच नसते. तो प्रत्येकाच्या अंतर्मनाच्या गाभ्यात साठवून ठेवायचा असतो. आता हेही हळहळू बदलू लागले.. पहाटे उठून नववस्त्र परिधान करून लगबगीने सांस्कृतिक कार्यक्रमांना जाण्याची नवी लाट आता स्थिरस्थावर होऊ लागली आहे.



सुख आणि समाधान यांमधला फरक जाणवणारा हा एकमेव सण. वर्षांत क्वचित मिळणारा फराळ, कपड्यांची वार्षिक खरेदी, गोडधोड खाणे अशा अप्रूपाचा हा सण. आनंद साजरा करण्यासाठी गरीब -श्रीमंत अशी वर्गवारी न करणारा आणि सगळ्यांच्या नजरेत समाधानाचे थेंब साठवणारा, साध्या साध्या गोष्टीतही मनाला सुखावणारा हा सण म्हणूनच प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा आणि वाट पाहायला लावणारा. शरीराला होणाऱ्या संवेदनांमुळे सुख मिळते आणि मनाला स्पर्श करणाऱ्या छोट्या छोट्या गोष्टीही समाधानाचे माप पदरात टाकतात. जरा नीट न्याहाळले, तर एरवी सतत दुर्मुखलेल्यांच्या डोळ्यांत हे पैशांपलीकडचे समाधान कसे तरळत असते, हे पाहण्यातही कमालीची उभारी देणारे असते. आता दिवाळीत मिळणाऱ्या सुटीत कौटुंबिक सहली निघतात. हॉटेले आणि रिसॉर्ट सहा सहा महिने आधीपासूनच 'बुक' होतात. कुटुंबासह एवढा काळ घालवायला कुठे मिळतो आजकाल? काहीच न करता केवळ मौजमजा करण्याची चाकरमान्यांची गरज गेल्या काही वर्षांतील वाढत्या गुंतागुंतीमुळे वाढतच चालली आहे. सततचा ताण, उद्दिष्टपूर्तीची धडपड, त्यासाठी करावे लागणारे अहोरात्रीचे कष्ट यातून चार घटका दूर जाण्याची संधी देणारा दिवाळी हा सण ही प्रत्येकाची गरज होऊन बसली आहे. बाजारपेठेतून हिंडताना काचेच्या मागे असलेल्या अनेक वस्तुंकडे हावऱ्या नजरेने पाहणाऱ्यांना दुकानात शिरण्याची संधी दिवाळी देते. वस्तू हाताळून त्यांना स्वप्नात नेण्याची सोय दिवाळीत होते. आंतरजालावर वर्षभर खरेदीचा सपाटा लावणाऱ्यांना केवळ फोटो पाहूनच निर्णय घ्यावा लागतो. घरपोच मिळणाऱ्या वस्तूंमुळे खरेदीचा आनंदही मावळत असतानाही गेल्या काही दिवसात सगळीकडे बाजार फुलल्याचे दिसणारे चित्र अधिक समाधानाचे. वाहतूक कोंडीच्या नावाने शिव्यांच्या लाखोल्या वाहत त्या गर्दीच्या लोटात स्वतःला लोटून देणारे नागरिक ही दिवाळीची खूणगाठ.

हे खरे की यंदाची दिवाळी आणखीच निराळी आहे. एरवी वातावरणातच दिवाळीचा उल्हास भरून वाहात असतो. थंडीचे आगमन होत असते आणि त्याचा आल्हाद मनालाही शिवत असतो. अशा वेळी केवळ मौज करणे, ही मानवी मनाच्या आरोग्यासाठीची आवश्यक गोष्ट. यंदा मात्र अवेळीच पाऊस आणि दिवसा ऑक्टोबरचे ऊन अशी स्थिती. सकाळ उजाडते ती शहरांत तरी धुरकटलेली. तरीही संध्याकाळ हा खरेदीचा काळ ही खूणगाठ मात्र कायम राहिली आहे. एरवी दिवाळीतच खायला मिळणाऱ्या खाद्यपदार्थांची गंमत आता राहिली नाही. लाडू, चिवडा, चकली, अनारसे, शेव या फराळीय पदार्थांचे सेवन बारा महिने होत असल्याने त्याचे अप्रूप संपले आहे. कपडेलत्तेही वर्षभर खरेदी होतच असतात. गोडाधोडाला आता निमित्त लागत नाही. वस्तूंच्या खरेदीसाठी दिवाळीचाच मुहूर्त लागत नाही. नवे संकल्प या सणाला करायचे नसल्याने, केलेल्या संकल्पांचे काय झाले, याची उजळणी करण्याचीही आवश्यकता वाटत नाही. वातावरणात भरून राहिलेला उत्साह आणि त्याला मनातून मिळणारा प्रतिसाद हे या सणाचे खरे वैशिष्टय़. मनातील तमाची काजळी दूर करण्यासाठी, बदललेल्या निसर्गचक्राने निर्माण केलेल्या अडचणींवरही मात करता येतेच. पावसाच्या भीतीने गळाठून गेलेल्या वातावरणातही दिवाळी असतेच. ती आधी मनात निर्माण व्हायला हवी. त्यासाठी मन शुद्ध करायला हवे. ते झाले की तमाच्या तळाशी दिवे लागतात, उत्साह संचारतो, जगण्याचे नवे बळ एकवटता येते, नव्या भरारीची स्वप्ने पडू लागतात.

गेल्या वर्षीची दिवाळी भीतीच्या वातावरणातच साजरी झाली. भविष्यात काय वाढून ठेवले आहे, या काळजीने दिवाळी फक्त 'साजरी' झाली. आरोग्य व्यवस्थेवरील खर्चाच्या ताणाखाली देशाच्या अर्थव्यवस्थेवरही ताण आला. साठवून ठेवलेले पैसे दिवाळीत खर्च करायलाही हात घाबरत होते. 'असू देत ते, पुढे उपयोगाला येतील' अशा काजळीने सगळे मनानेच थकले होते. आता ती काजळी सरलेली दिसते. आर्थिक मंदीने झाकोळलेल्या जगातील अनेक देशांच्या तुलनेत भारताची स्थिती अगदीच वाईट नाही, हा दिलासाच बाजारपेठेतील गर्दीने दिला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२२-२३ या वर्षांसाठी भारताच्या विकास निर्देशांकांचे भाकीत ७.४ टक्क्यांवरून ६.८ टक्के एवढे कमी केले होते. तरीही 'जी २०' देशांच्या तुलनेत (सौदी अरेबिया वगळता) भारताचा विकास दर अधिकच होता. अनेक जागतिक संस्थांनी हा विकास निर्देशांक ६ टक्क्यांपर्यंत खाली आणला असला तरीही तो वेग अन्य देशांच्या तुलनेत अधिक मानला जातो. खिशातले पैसे खर्च करण्यातील सढळ हातामुळेच देशाच्या अर्थव्यवस्थेला उजळा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय मानसिकतेतील हा बदल उत्साहवर्धक म्हटला पाहिजे. बाजारात पैसा खेळू लागला की उद्योगांनाही चालना मिळते. करोनापूर्व स्थितीत देश पोहोचू लागल्याचे हे निदर्शक. उद्योगांना बळ देणारे हे वातावरण दिवाळीच्या निमित्ताने पुन्हा अनुभवायला मिळणे हा वेगळाच सुखद अनुभव. सुख मानण्यावर असते, तेव्हा डॉलरकडे पाहायचे नाही.. आपण खर्च करायचा, हे जणू नोकरदार मध्यमवर्गीयांना आपसूक उमगले आहे.

● ● ●

## 'मेट्रोमोनियल' साईटवरुन लावला पाच लाखांचा चुना; लग्नाचं आमिष दाखवत अत्याचारही केला!




मेट्रोमोनियल साईटच्या माध्यमातून एका ठगबाजाने शहरातील तरुणीशी संपर्क केला. रेल्वेत लोकोपायलट असल्याची थाप मारून लग्न पक्के केले. हॉटेलमध्ये बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचारही केला. आर्थिक अडचणीत असल्याचे सांगत तिच्याकडून 5 लाख रुपये घेतले आणि नंतर सर्व संपर्क तोडले. पीडितेने गणेशपेठ पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी 29 वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून आकाश अनिल जाधव (31) रा. भोपाळ विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

पीडित तरुणी व्यवसाय करते. लग्नासाठी तिने मेट्रोमोनियल संकेतस्थळावर आपला प्रोफाईल तयार केलं होतं. फेब्रुवारी महिन्यात आकाशने पीडितेशी संपर्क केला. मेट्रोमोनियल साईटवर प्रोफाईल पाहिल्याचे सांगत लग्नाचा प्रस्ताव मांडला. आकाशने पीडितेला रेल्वेत लोकोपायलट असल्याचे सांगितले होते. दोघांमध्ये बोलचाल सुरू झाली. तो पीडितेला भेटायला नागपुरात आला आणि लग्न पक्के केले. काही दिवसांनी तो पुन्हा नागपूरला आला. गणेशपेठ ठाण्यांतर्गत एका हॉटेलमध्ये खोली बुक केली. पीडितेला भेटायला बोलावले आणि शारीरिक संबंधासाठी बळजबरी करू लागला. पीडितेने विरोध केला असता लग्न करण्याचा विश्वास दिला.

आधीपासूनच होता विवाहित

लग्नाची सर्व बोलणी झाल्यानंतर आकाशने सांगितले की, नोकरीमुळे तो वारंवार नागपूरला येऊ शकत नाही. त्यामुळे नागपुरातच बदली करून घेणार आहे. मात्र त्यासाठी 5 लाख रुपयांची आवश्यकता आहे. इतके पैसे सध्या त्याच्याकडे नाहीत. पीडितेने त्याच्यावर विश्वास करून 5 लाख रुपये दिले. पैसे मिळाल्यानंतर आकाशने पीडितेशी सर्व प्रकारचे संपर्क तोडले. यामुळे त्याच्याबाबत माहिती काढून पीडिता काही दिवसांपूर्वी भोपाळला गेली. तिथे माहिती झाले की, आकाश आधीपासूनच विवाहित आहे

## पॅरोलवर बाहेर आलेल्या गुन्हेगाकडून मुलाच्या साखरपुड्या साठी खंडणीची मागणी, पोलिसांनी पुन्हा ठोकल्या बेड्या



मुंबई : पॅरोलवर बाहेर आलेल्या कुख्यात गुन्हेगाराला बांधकाम व्यवसायिकाला धमकवल्या प्रकरणी अटक करण्यात आलीय. गणेश शिंदे असं या कुख्यात गुन्हेगाराचं नाव असून त्याने बांधकाम व्यवसायिक सुधाकर शेट्टी यांना धमकावले आहे. शेट्टी यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. तक्रार प्राप्त होताच खंडणी विरोधी पथकाने कारवाई करत गणेश शिंदेला तत्काळ अटक केली. पोलिसांनी गणेश शिंदे याचा मुलगा भावेश शिंदे ( वय, 24 ) याला देखील अटक केली आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गणेश शिंदे याने बिल्डरकडून 50,000 रुपये घेतले होते आणि मुलाच्या साखरपुड्यासाठी आणखी रोख रकमेची मागणी करत होता. परंतु, शेट्टी यांनी आणखी जास्तीची रक्कम नाकारल्यामुळे वांद्रे, पश्चिम येथील रुग्णालयात घांनी त्यांच्या रुण्यालातील खोलीत घुसून खंडणीचे पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार सुधाकर शेट्टी यांनी दाखल केली आहे.या प्रकरणानंतर मुंबई पोलिस तुरुंग प्रशासन आणि न्यायालयाला अहवाल पाठवणार असून पॅरोलवर सुटलेला असताना असा गंभीर गुन्हा केल्या प्रकणी या संपूर्ण प्रकरणचा पोलिस तपास करत आहेत. शिंदेवर खंडणी, खुनाचा प्रयत्न, गोळीबार, कारागृहातून पळून जाणे, पोलिस कोठडीत दारू पिणे यासह 16 हून अधिक गुन्हे दाखल आहेत. त्याच्यावर मकोका कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.गणेश शिंदे याच्यावर इतक्या गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असतानाही न्यायालयाने त्याला पॅरोलवर सोडण्याचे आदेश कसे दिले? गणेश शिंदेवर गंभीर गुन्हे असूनही त्याला नुकतीच 28 दिवसांची तुरुंगातून फुर्लफ सुट्टी देण्यात आली होती. सुरुवातीला कोणत्याही गुन्हेगाराला पॅरोलवर सोडताना तुरुंग अधिकाऱ्यांना तपास अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येते. मात्र शिंदेची सुटका करताना पोलिसांनी बदलापूर पोलिसांना विचारले होते.

परंतु, त्यांना शिंदेच्या गुन्हेगारी कारवायांबद्दल माहिती नव्हती. गणेश शिंदे याला यापूर्वी 2011 मध्ये सायन येथे झालेल्या गोळीबार प्रकरणात पोलिसांनी अटक केली होती. काय आहे मकोका कायदा? संघटित स्वरुपातील गुन्हे करणाऱ्या टोळींवर मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येतो. यामध्ये खून, खंडणी, अपहरण, अंमली पदार्थांची तस्करी, हप्तेवसुली, सुपारी देणे, अशा प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश होतो.

## पुणे पोलिसांची मोठी कारवाई, दहा लाख रूपये किमतीचा टॉईजसाठा जप्त




पुणे : पुणे पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पुण्यात दहा लाख रुपये किमतीचे "सेक्स टॉईज" जप्त करण्यात आले आहेत. पुण्यातील लष्कर पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी एका गोदामावर छापा ठाकून ही कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी दहा लाख रुपयांचा मुद्देमाल शहरातील एका गोडाऊनमधून जप्त केला आहे. याप्रकरणी एका व्यक्तीवर कलम 292,293 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या सगळया वस्तूंची ऑनलाईन विक्री सुरू होती अशी प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी तपास सुरू असून सेक्स टॉईज सापडलेल्या गोडाऊनमध्ये असलेल्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच काही अल्पवयीन मुलांना हे सेक्स टॉय विकल्या जात होत्या का याचा तपास पोलिस करत आहेत. संकेतस्थळावरून सेक्सटॉईजची विक्री होत असल्याची माहिती लष्कर पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पुण्यातील पुलगेट चौकीच्या बाजुला असलेल्या भाजी बाजारच्या गोदामावर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी गोडाऊनमध्ये अनेक सेक्स टॉय होते. याची किंमत जवळपास दहा लाख रूपयांच्या आसपास होती. पोलिसांनी गोदामातील एका व्यक्तीला ताब्यात घेत हा सर्व मुद्देमाल जप्त केला.

# पीएफआयचे धागेदोरे जळगावात, अटकेत असलेल्या पीएफआयच्या पदाधिकाऱ्यांचे मोबाइल मारायचा क्लीनअप



पीएफआयच्या आणखी एकाला एटीएसने जळगाव येथून ताब्यात घेतलेले आहे. मागील काही दिवसांपासून दहशतवादी कारवाया आणि कट कारस्थानाच्या आरोपांखाली पीएफआय संघटनेला रडारवर घेतले आहे. त्यातील ज्या संशयितांना एटीएसने अटक केली आहे त्यांच्या मोबाइल फॉरमॅट करणाऱ्या एकाला जळगावमधून ताब्यात घेतले आहे. नुकतेच त्याला नाशिकच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते, त्यात त्याला 14 दिवसांची एटीएस कोठडी सुनावली आहे. उनैस उमर खय्याम पटेल असे त्याचे नाव असून त्याने पुरावे नष्ट करण्यासाठी मोठी जबाबदारी हाती घेलत्याचे समोर येत आहे. संशयित पटेल याचे काही आक्षेपार्ह संवादाचे ऑडिओ क्लिपही एटीएसच्या हाती लागल्या आहेत. त्यानुसार त्याचीही सखोल चौकशी एटीएसकडून करण्यात येणार आहे. एटीएसने गेल्या महिन्यात मालेगावातील एकासह पाच संशयितांना अटक केली असून, सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. देशविघातक कारवाया आणि सामाजिक अशांतता निर्माण करण्याच्या आरोपाखाली जेरबंद केलेल्या संशयितांचा डेटा फॉरमॅट करणाऱ्याला अटक करण्यात आली आहे. पॉप्युलर फ्रंड ऑफ इंडिया (पीएफआय) या बंदी घालण्यात आलेल्या संघटनेच्या संशयितांच्या मोबाईल, लॅपटॉपमधील संवेदनशिल डेटा फॉरमॅट केल्याची बाब उघड झाली आहे. नाशिकच्या दहशतवाद विरोधी पथकाने म्हणजेच एटीएससने उनैस उमर खय्याम पटेल याला जळगावमधून अटक केली आहे. त्याला न्यायालयाने ४ नोव्हेंबरपर्यंत १४ दिवसांची एटीएस कोठडी सुनावली आहे. याशिवाय पटेल यांच्या आक्षेपार्ह संवादाच्या ऑडिओ क्लिपही एटीएसच्या हाती लागल्या असून त्याचीही सखोल सुरू करण्यात आली आहे. नाशिक एटीएसने जेरबंद केलेल्या पाच जणांचा तपास करत असतांना त्यांचे मोबाइल आणि लॅपटॉप आणि अन्य साहित्य ताब्यात घेतले होते. त्यातील संवेदनशील डेटा फॉरमॅट केल्याचे सामोर आले आहे.

# मृत महिलेची संपत्ती लुबाडण्याचा डाव; मन्नत बाबासह सात जणांविरोधात गुन्हा दाखल

**कॅन्सरच्या तिसऱ्या स्टेजमध्ये असलेल्या रुग्णाला डॉक्टरांच्या सल्ल्याविरुद्ध आरोपींनी रुग्णालयातून बाहेर घेऊन जात बक्षीसपत्र आणि मृत्यूपत्र बनवून घेतले होते. चौकशीनंतर हा प्रकार उघडकीस आला.**

एका मृत कॅन्सरग्रस्ताची मालमत्ता स्वतःच्या नावावर करण्याचे षडयंत्र रचल्याप्रकरणी सदर पोलिसांनी सात आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.
आरोपींमध्ये भोपाळचे प्रसिद्ध मन्नत बाबा उर्फ संजयकुमार सिंग, देवीदास गावंडे (गड्डीगोदाम), गीता देवीदास गावंडे, धीरज गावंडे, कुणाल गावंडे, दिनेश आजारी (शिवाजीनगर), प्रमोद डवले (सुरेंद्रनगर) यांचा समावेश आहे.
याबाबत मोहननगर येथील रहिवासी प्रियांका शंभरकर यांनी तक्रार दाखल केली होती.
प्रियांकाच्या वडिलांची मावशी कुसुम शंभरकर यांना मूलबाळ नव्हते. मध्य प्रदेश मंत्रालय (भोपाळ) येथे कार्यरत असलेल्या कुसुम शंभरकर यांनी प्रियंकाला बालपणी दत्तक घेतले होते. ते मूळचे नागपूरचे रहिवासी असल्याने त्यांची सर्व मालमत्ता नागपुरात आहे. प्रियांकाच्या





संगोपनाची जबाबदारी कुसुम शंभरकर घेत होत्या. दरम्यान आरोपी मन्नत बाबाशी कुसुम शंभरकरची भोपाळमध्ये ओळख झाली. पूजेच्या निमित्ताने ती बाबाला भेटत असे. 2009मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर कुसुम शंभरकर या नागपुरात एका घरात राहत होत्या. कॅन्सरमुळे त्यांना 9 सप्टेंबर 2021 रोजी त्यांना मानकापूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांचे 30 ऑक्टोबर 2021 रोजी निधन झाले.
तिसऱ्याच दिवशी मन्नत बाबा पोहोचला घरात
कुसुम शंभरकर यांच्यावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी पूजेच्या वेळी मन्नत बाबाने त्यांच्या घरी पोहोचून प्रियंकाची भेट घेतली. कुसुम यांनी मोहननगर येथील फ्लॅट व नारीचा प्लॉट माझ्या नावावर व बाबादीपसिंग नगर घर येथील मामा देवीदासचा मुलगा धीरज याच्या नावे केला असल्याचे सांगितले. मन्नत बाबाने केलेल्या या दाव्यानंतर प्रियंकाला आपल्याविरोधात काहीतरी मोठे षडयंत्र रचल्याचा संशय आला.
चौकशीत त्यांना रुग्णालय प्रशासनाकडून समजले की कुसुम यांना 15 सप्टेंबर रोजी संजयकुमार सिंग उर्फ मन्नत बाबा आणि त्याच्या मामाच्या कुटुंबियांनी डॉक्टरांच्या सल्ल्याविरुद्ध अचानक रुग्णालयातून बाहेर काढले होते. कुसुम कॅन्सरच्या तिसऱ्या टप्प्यात असल्यामुळे त्यांना डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवणे आवश्यक होते.
रुग्णालयातून बाहेर काढताच बक्षीसपत्र आणि मृत्यूपत्र 15 सप्टेंबर रोजी रुग्णालयातून बाहेर आणल्यावर दुसऱ्या दिवशी 16 सप्टेंबर रोजी मन्नत बाबाला त्याच्या नावावर फ्लॅट आणि प्लॉटचे गिफ्ट डीड केली. त्याच्या मामाच्या कुटुंबियांनी बाबाच्या संगनमताने आरोपी धीरजच्या नावे बाबादीपसिंग नगर येथे एक मजली घराचे मृत्यूपत्र केले होते. ही कागदपत्रे तयार करण्यासाठी इतर आरोपींनी मदत केली. यानंतर 16 सप्टेंबर रोजी कॅन्सरग्रस्त कुसुमला आरोपींनी गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रियांका आणि शंभरकर कुटुंबियांना कोणतीही माहिती देण्यात आली नाही.
आरोपीविरोधात गुन्हा दाखल यासंदर्भात केलेल्या तक्रारीकडे पोलिसांनी गांभीर्याने लक्ष दिले नाही. अखेर एनजीओ कृती समिती आणि ॲड. व्ही.व्हगी. महंत यांनी न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. सदर पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम 406, 420, 468, 471 व 34 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# जमतारा स्कॅमपेक्षाही मोठा स्कॅम ! ना OTP शेअर, ना कोणत्या लिंकवर क्लिक, तरिही खात्यातून पैसे गायब

मुंबई : जमतारा हा फिशिंगचा स्कॅम तर वेब सीरीजमुळे सगळ्यांना माहीत झाला आहेच. पण त्याहीपेक्षा एक मोठा स्कॅम सध्या सुरु आहे. मुंबईत एटीएम वापरणाऱ्यांना या स्कॅमचा फटका बसतोय. मुख्य म्हणजे बँकांना सलग सुट्या लागण्याच्या बरोबर आधी एटीएम कार्ड क्लोन करुन बँक खाती खाली करण्याचा गोरखधंदा काही लुटारुंनी सुरु केला आहे. सात जणांची एक गँग यामध्ये सक्रिय असल्याचा संशय मुंबई पोलिसांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी एका खासगी बँकेनं अंधेरी पोलिसात (M u m b a i Crime News) तक्रारही दाखल केली आहे. तब्बल 6 लाख रुपये एकाकडी काढून घेण्यात आल्याचं समोर आल्यानं एकच खळबळ उडालीय. त्यामुळे बँकेत पैसे ठेवणंही आता असुरक्षित बनलंय की काय? अशी भीती अनेकांना वाटतेय. त्यामागचं कारणही तसंच आहेत. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, एका खासगी बँकेच्या दोन एटीएममधून तब्बल 6 लाख 40 हजार रुपयांचे बोगस ट्रान्झॅक्शन करण्यात आले. अंधेरी पूर्वेच्या एमआयडीसी पोलीस स्थानकात याप्रकरणी बँकेनं तक्रार दिली आहे. सध्या पोलिसांकडून या संपूर्ण प्रकाराचा तपास केला जातोय. मरोळ इथं एका खासगी



बँकेची शाखा आहे. तिथेच जवळ बँकेचं एटीएमदेखील आहे. या एटीएमबाहेर दिवसा एक सुरक्षारक्षक असतो. पण रात्री कुणीही नसतं. ऑक्टोबर 10 रोजी करण्यात आलेल्या हिशेबात 5.50 लाख रुपयांचा काहीच ताळमेळ लागत नसल्याचं समोर आलं. त्यानंतर तसे ई-मेल बँकेच्या वरिष्ठांकडून करण्यात आले. अखेर हा सगळा संशयास्पद प्रकार उघडकीस आला. 4 ऑक्टोबर रोजी 500 रुपयांचं एक बोगस ट्रान्झॅक्शन करण्यात आल्याचं निदर्शनास आलं. मरोळमधील एटीएममधून हे पैसे काढण्यात आले होते. धक्कादायक बाब म्हणजे एटीएम कार्ड क्लोन करुन भामट्यांनी हे ट्रान्झॅक्शन केलं होतं. चकीत करणारी गोष्ट म्हणजे त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तब्बल 49 ट्रान्झॅक्शन करण्यात आले. क्लोन कार्डच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या ट्रान्झॅक्शनद्वारे तब्बल 4 लाख 90 हजार रुपये काढण्यात आले होते. तर 6 ऑक्टोबरला आणखी 7 ट्रान्झॅक्शन करण्यात आले. यावेळी 70 हजार रुपये काढण्यात आले होते. या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल झाल्यानंतर सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्याचं पोलिसांनी ठरवलं. पोलिसांनी 4 ऑक्टोबरपासून 6 ऑक्टोबर पर्यंतचं सीसीटीव्ह तपासलं. त्यात सहा ते सात संशयास्पद लोकं एटीएम असलेल्या ठिकाणी पैसे काढताना आढळून आलीत.
हीच लोकं चकाला येथील दुसऱ्या एका एटीममध्येही पैसे काढताना आढळली आहेत. चकालामधूनही 10 हजार रुपयाचे ट्रान्झॅक्शन क्लोन कार्डच्या मदतीने भामट्यांनी केलं होतं. या धक्कादायक प्रकरणानंतर आता एमआयडीसी पोलिसांकडून अधिक तपास केला जातो आहे. हे भामटे कोण आहेत, यांची गँग किती मोठी आहे, असे अनेक सवाल उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे याआधीही अनेकदा लोकांच्या बँक खात्यातून अनेकदा पैसे एटीएम कार्ड क्लोन करुन लंपास करण्यात आल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे कार्ड क्लोन करणारी ही टोळी देशभर पसरलेली असण्याचा दाट संशय व्यक्त केला जातोय. या गँगच्या मुसक्या आवळण्याचं आव्हान सध्या मुंबई पोलिसांसमोर उभं ठाकलंय.

# 7 लाख 93 हजार रुपये किंमतीच्या सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांची चोरी

पुणे : धनत्रयोदशीच्या निमित्ताने पूजा करण्यासाठी बँकेच्या लॉकरमधून घरी आणलेल्या ७ लाख ९३ हजार रुपये किंमतीच्या सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांवर चोरट्यांनी डल्ला मारला. कर्वेनगर येथील एका बंगल्यात शुक्रवारी रात्री ११ ते सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान झालेल्या या चोरी प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुणे विद्यापीठ सोसायटीतील एका बंगल्यात राहणाऱ्या ३० वर्षाच्या तरुणाने फिर्याद दिली आहे. धनत्रयोदशीच्या दिवशी धनाचे प्रतीक म्हणून सोन्या-चांदीचे दागिन्यांचे पूजन केले जाते. त्यासाठी या तरुणाने बँकेच्या लॉकरमधून सोन्याचे व चांदीचे दागिने घरी आणले होते. त्याचे विधिवत पूजन केल्यानंतर फिर्यादी व त्यांचे कुटुंब रात्री झोपले. मात्र, त्यांनी बंगल्याचा दरवाजा पूर्णपणे लॉक केला नाही. त्याचा फायदा



घेत चोरट्यांनी घराच्या उघड्या दरवाजातून आत प्रवेश करत देवघराजवळ ठेवलेले ७ लाख ९३ हजार ८०० रुपये रुपये किंमतीचे २२६ ग्रॅम सोन्याचे व पन्नास ग्रॅम चांदीचे दागिने चोरुन नेले, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर पारवे या गुन्ह्याचा तपास करत आहेत. चाळीस मोबाइल लंपास धनत्रयोदशीच्या दिवशी हडपसर परिसरातील एका मोबाइल विक्री दुकानाच्या शटरवरील खिडकी तोडून चोरट्यांनी दुकानातील ७ लाख १८ हजार ३७८ रुपये किंमतीचे चाळीस मोबाईल लंपास केले. याबाबत दुकानचालकाने फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक शिंदे तपास करत आहेत. याशिवाय उंड्री येथील कानडे नगर परिसरातील एका किराणा व शीतपेयांची किरकोळ विक्री करणाऱ्या गोदामाचा पत्रा उचकटून चोरट्यांनी तेलाचे डबे, शीतपेयांचे बॉक्स, काजू, बदाम, वेलदोड्याची पाकिटे असे ८९ हजार ७५० रुपयांचे साहित्य चोरुन नेले. याबाबत गोदामाच्या मालकाने फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनोळखी चोरट्यांविरोधात कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बिराजदार तपास करत आहेत.

# कापसाच्या शेतात केली गांजाची लागवड, गुन्हा दाखल, अडीच लाखांचा गांजा जप्त



नांदेडमधीलकिनवट तालुक्यात तीन शेतकऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. तीन शेतकऱ्यांनी आपल्या कापसाच्या शेतात विनापरवाना बेकायदेशीर गांजाची लागवड केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं ही कारवाई करत गांजा ताब्यात घेतला आहे. किनवट तालुक्यातील चंद्रपूर येथील एका शिवारात तीन शेतकऱ्यांनी संगनमत करत विनापरवाना बेकायदेशीर गांजाची लागवड केली. कापसाच्या शेतात तिघांनीही गांजाची लागवड केली होती. यासंदर्भातील माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं कारवाई करून तब्बल 52 किलो गांजा जप्त केला आहे. ही कारवाई काल (रविवारी) दुपारी अडीचच्या सुमारास करण्यात आली आहे. किनवट तालुक्यातील चंद्रपूर शिवारात येथील तीन शेतकऱ्यांनी कापसाच्या शेतात चक्क गांजाची लागवड केली आहे. आपल्या शेतात बेकायदेशीरित्या एनडीपीएस कायद्याचा भंग करत अंमली पदार्थ गांजाच्या झाडांची लागवड केल्याची माहिती गस्तीवर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांना मिळाली होती. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना माहिती दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेनं चंद्रपूर शिवारातील कापसाच्या शेतावर कारवाई केली. कारवाईमध्ये गुन्हे शाखेनं शेतातील तब्बल 52 किलो 200 ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला. या गांजाची किंमत तब्बल दोन लाख 61 हजार चारशे रुपये असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या वतीनं देण्यात आली आहे.

# नवराच बनला हैवान; राग अनावर झाल्याने पेट्रोल टाकून बायकोला जाळले

दुमकाः जिल्ह्यात पुन्हा एकदा पेट्रोलने जाळण्याची घटना घडली आहे. यावेळी पती-पत्नीमधील भांडण यासाठी कारणीभूत ठरले आहे.दुमका येथे पेट्रोल टाकून जाळल्याची ही तीसरी घटना आहे. गोपीकंदर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खडकसोल गावात घडलेल्या या घटनेत पेट्रोलने पेटलेल्या महिलेला गंभीर अवस्थेत फुलो झानो मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले असून तिला रिम्समध्ये पाठवण्यात आले आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. नवऱ्याची दिली होती धमकीः फुलो झानो मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये महिलेने दिलेल्या जबानीनुसार ती आपला पती परमेश्वर सोरेनसोबत सिलांगी गावात राहते. बुधवारी तीचा पती



'सरकार तुमच्या दारी' या कार्यक्रमाला गेला होता. तर ती दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या खडकसोल येथे तीच्या आजीकडे गेली होती. रात्री परमेश्वर घरी आला मात्र रुपा घरी नसल्याचे पाहून त्याने आजीचे घर गाठले. तिथे पत्नी रूपाला पाहून त्याला राग आला आणि त्याने तीला धमकी देत घरी वापस येण्यास सांगितले.गोपीकंदर पोलीस ठाणेगोपीकंदर पोलीस ठाणेचुलीत पेट्रोल सांडल्याने साडीला आगः
रूपाने घरी नकार दिल्याने संतापलेल्या परमेश्वरने मोटारसायकलच्या ट्रंकमधून पेट्रोल भरलेली बाटली बाहेर काढली आणि रूपाला जाळण्याची धमकी दिली. या धमकीने रूपा घाबरली आणि तिने त्याच्या हातातील पेट्रोल हिसकावून फेकण्याचा प्रयत्न केला. या हाणामारीत बाटलीतून पेट्रोल सांडून रूपाजवळील जळत्या आगीवर पडले. चुलीत पेट्रोल पडल्याने चुलीला आग लागली आणि रूपाच्या साडीने पेट घेतला. यात ती गंभीरपणे जळून खाक झाली. फुलो झानो मेडिकल कॉलेज हॉस्पिटलफुलो झानो मेडिकल कॉलेज हॉस्पिटलपीएचएमसीएचकडून रूपाला रिम्सला पाठवलेः महिलेला पेट्रोल टाकून जाळल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर कार्यकारी दंडाधिकारी चंद्रजित सिंह, डीएसपी विजय कुमार पीजेएमसीएचमध्ये पोहोचले. जेथे रूपा यांचे म्हणणे कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी घेतले. रूपाची चिंताजनक प्रकृती पाहून तिला रिम्समध्येरेफर करण्यात आले.

पोलीस बातमी पत्र
ALL SCAN & PAY ACCEPTED HERE
PhonePe
G Pay
Pay

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898